महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

पी.आर-३/सबसिडी/ No 07260 दिनांक : 12 MAR 2013

**वाणिज्य परिपत्रक क्र. १८९.**

**विषय :-** सन २०१२-१३ च्या खरीप हंगामातील ५० पैशांपेक्षा कमी अंतिम पैसेवारी असलेल्या टंचाईग्रस्त परिस्थिती जाहीर करण्यात आलेल्या गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलात ३३.५% सवलत देण्याबाबत.

**संदर्भ :-** १. शासन निर्णय क्र. एससीवाय २०१२/प्र.क्र.४२८/म-७ दिनांक ०९/०१/२०१३.
२. शासन निर्णय क्र. एससीवाय २०१२/प्र.क्र.४२८/म-७ दिनांक ०६/०२/२०१३.

संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे शासनाने राज्यातील सन २०१२-१३ च्या खरीप हंगामात ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णयात ५० पैसे वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलामध्ये ३३.५ टक्के इतकी सवलत देण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार शासन आदेशाप्रमाणे टंचाईग्रस्त गावातील कृषी ग्राहकांना शासनाच्या धोरणानुसार प्रचलित सवलतीच्या दरामध्ये ३३.५% सवलत देण्यात यावी.

तसेच सदर शासन निर्णयानुसार ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या गावांतील स्वतंत्र नळपाणी पुरवठा योजनांची चालु विज देयके वाणिज्य परिपत्रक क्र. १८४ दि. ११/०१/२०१३ च्या अटीस अधीन राहून वसुल करण्यात यावी.

जिल्हा निहाय खरीप हंगामात अंतीम पीक पैसेवारीनुसार ५० पैसे वा त्यापेक्षा कमी असलेल्या गावांची संख्या परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली असुन टंचाईग्रस्त गावांची यादी त्वरीत जिल्हाधिका-यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी.

खरीप हंगाम २०१२-१३ या वर्षाकरीता टंचाई परिस्थिती जाहीर झालेल्या गावांची व कृषी ग्राहकांची माहिती संबंधीत माहिती व तंत्रज्ञान विभागास देण्यात यावी. तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून सदरच्या सवलतीच्या वीज दराची देयके वितरीत करण्यात यावीत.

शासनाच्या सवलतीच्या दराने चालू वीज देयकाचा भरणा न करणा-या कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा नियमानुसार / कायद्यानुसार खंडीत करण्याची कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

डॉ. पु. शा. कु.
**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

**प्रत सस्नेह रवाना :-**
मुख्य महाव्यवस्थापक, (माहिती व तंत्रज्ञान), म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.
-- आपणास कळविण्यात येते की, वरील विषया संदर्भात खरीप हंगाम २०१२-१३ या वर्षात टंचाईग्रस्त गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलात शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरात ३३.५ टक्के सवलत देण्यात यावी व दिलेल्या सवलतीपोटी वितरण कंपनीवर पडणा-या आर्थिक बोजाची परिमंडळ व ग्राहक संख्या निहाय माहिती त्वरीत पाठविण्यात यावी. जेणेकरुन शासनाकडून आर्थिक पूर्ततः करण्याकरीता प्रस्ताव पाठविण्यास मदत होईल.

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे**

## शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एससीवाय-२०१३/प्र.क्र.४२८/म-७, दिनांक ९ जानेवारी, २०१३ चे सहपत्र

## परिशिष्ट-अ

## खरीप हंगाम २०१२-२०१३ ची अंतिम पैसेवारी जाहीर केलेल्या गावांची संख्या

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | पैसेवारी जाहीर केलेली गावे (खरीप) | ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेली गावे | ५० पैशांपेक्षा जास्त पैसेवारी असलेली गावे |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे | १८८८ | ०० | १८८८ |
| | | रायगड | १८९१ | ०० | १८९१ |
| | | रत्नागिरी | १५२३ | ०० | १५२३ |
| | | सिंधुदुर्ग | ७३७ | ०० | ७३७ |
| | एकूण | | ६०३९ | ०० | ६०३९ |
| २ | नाशिक | नाशिक | १९६० | ९०२ | १०५८ |
| | | धुळे | ६७६ | २४५ | ४३१ |
| | | नंदुरबार | ८७९ | ० | ८७९ |
| | | जळगाव | १५०१ | ११७९ | ३२२ |
| | | अहमदनगर | १५३० | ५८० | ० |
| | एकूण | | ६६०६ | २९०६ | २६९० |
| ३ | औरंगाबाद | औरंगाबाद | १३५३ | ११७६ | १७७ |
| | | जालना | ९७० | ९७० | ० |
| | | परभणी | ८४८ | ३० | ८१८ |
| | | हिंगोली | ७०७ | ० | ७०७ |
| | | नांदेड | १५७५ | ० | १५७५ |
| | | बीड | १४०३ | ६८५ | ७१८ |
| | | लातूर | ९४३ | ० | ९४३ |
| | | उस्मानाबाद | ४४४ | ४३८ | ६ |
| | एकूण | | ८२४३ | ३२९९ | ४९४४ |
| ४ | पुणे | पुणे | १३१२ | १७९ | ११३३ |
| | | सातारा | १४९८ | ४२४ | १०७४ |
| | | सांगली | ६३० | २४९ | ३८१ |
| | | सोलापूर | ०० | ०० | ०० |
| | | कोल्हापूर | १२१२ | ७ | १२०५ |
| | एकूण | | ४६५२ | ८५९ | ३७९३ |
| | **एकूण** | | **२५५४०** | **७०६४** | **१७४६६** |

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एससीवाय-२०१२/प्र.क्र.४२८/म-७,
दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३ चे सहपत्र

**परिशिष्ट-अ**

## खरीप हंगाम २०१२-२०१३ ची अंतिम पैसेवारी जाहीर केलेल्या गावांची संख्या

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | पैसेवारी जाहीर केलेली गावे (खरीप) | ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेली गावे | ५० पैशांपेक्षा जास्त पैसेवारी असलेली गावे |
|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | अमरावती | १९८१ | ० | १९८१ |
| | | अकोला | ९९७ | ० | ९९७ |
| | | यवतमाळ | २०४९ | ० | २०४९ |
| | | बुलढाणा | १४१९ | ७०८ | ७११ |
| | | वाशिम | ७९३ | ० | ७९३ |
| | **एकूण** | | **७२३९** | **७०८** | **६५३१** |
| २ | नागपूर | नागपूर | १८२१ | १२४ | १६९७ |
| | | वर्धा | १३४४ | ० | १३४४ |
| | | भंडारा | ८४६ | ० | ८४६ |
| | | गोंदिया | ९२३ | ० | ९२३ |
| | | चंद्रपूर | १३९६ | ० | १३९६ |
| | | गडचिरोली | १४६५ | ० | १४६५ |
| | **एकूण** | | **७७९५** | **१२४** | **७६७१** |
| | **एकूणात एकूण** | | **१५०३४** | **८३२** | **१४२०२** |